ISSN : 2278-9308


# Sanshodhan Samiksha

Language

Monthly Peer Reviewed International Research Journal

Special Issue February-2015



☐ Chief Editor - Prof. Virag S. Gawande
☐ Editor - Dr. Rajendra Haware

- PUBLISHED BY -

AADHAR SOCIAL RESEARCH & DEVELOPMENT TRAINING INSTITUTE, AMRAVATI, MS.

Scanned with OKEN Scanner

## आधार रिसर्च सिरीज : सायन्स अँन्ड सोशल सायन्स

राज्यशास्त्र
भौतिकशास्त्र
लायब्ररी सायन्स
सोशल वर्क
इतिहास
संस्कृत
गृहअर्थशास्त्र
संगीत
मानसशास्त्र
शिक्षणशास्त्र
शारीरिक शिक्षण
वाणिज्य व व्यवस्थापन
सहकार
मानसशास्त्र
मराठी
गणित
कायदा
समाजशास्त्र
रसायनशास्त्र
अर्थशास्त्र
उर्दू
पर्यावरणशास्त्र
भूगोल
सांख्यिकशास्त्र
तर्कशास्त्र

-अधिक माहितीकरिता संपर्क-
मुख्य संपादक – प्रा. विराग गावंडे, मो. ९५९५५६०२७८

**Aadhar Publication**
New Hanuman Nagar, Infront of Pathyapustak Mandal,
Behind VMV College, Amravati - 444604.
Email - aadharpublication@gmail.com, M.: 9595560278

ISSN : 2278-9308
2278-9308

ISSN - 2278-9308

# नारायण सुमंत यांच्या 'नारायण पासष्टी' कवितासंग्रहातील प्रतिमासृष्टी

प्रा. विजय पांडुरंग शिंदे
श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय,
आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली

प्रा. संतोष शाहू बोंगाळे
वेणूताई चव्हाण महाविद्यालय, कराड
ता. कराड, जि. सातारा

**प्रास्ताविक -**

कवी आणि काव्य यांचा संबंध जल आणि तरंग या संबंधासारखा असतो. कवी व्यक्त होतो तो आपल्या काव्यातूनच. त्याच्या भावना, कल्पना तो प्रतिमेत अचूक पकडतो. कोणताही कलावंत हा प्रतिमेच्या भाषेत बोलत असतो. कलाकृतीमध्ये कवी प्रतिमांची साधना करूनच नवीनतम अशा प्रतिमांचा स्वच्छंदपणे वापर करतो. कल्पना आणि भावना कवीच्या काव्यात प्रतिमांच्या माध्यमातून प्रगट होत असतात. म्हणून प्रतिमेला काव्यात अनन्य साधारण महत्व आहे. प्रस्तुत शोधनिबंध नारायण सुमंत यांच्या 'नारायण पासष्टी' या काव्यसंग्रहातील प्रतिमासृष्टी या अनुषंगाने करण्याचे योजिले आहे.

**प्रतिमेचे स्वरूप आणि व्याख्या -**

प्रतिमेचा अनेकांनी वेगवेगळया दृष्टीकोनातून अभ्यास केलेला आहे. समीक्षेत 'प्रतिमा' हा शब्द सर्रास वापरला जातो. समीक्षक, वैज्ञानिक व कलावंत यांनी आपापली मते मांडून प्रतिमेचा विचार केलेला दिसतो. कवितेमध्ये मर्ढेकरांनी नाविण्यपूर्ण प्रतिमा वापरून एक वेगळाच पायंडा पाडला. प्रतिमांचा वापर करताना अनेक रूपे स्पष्ट होत गेली. शैलीचेच एक अंग म्हणून प्रतिमेचा अभ्यास करणे अत्यावश्यक ठरते.

काव्याचा मूलभूत घटक म्हणून प्रतिमांकडे पाहिले जाते. सर्वसामान्यपणे व्यवहारी भाषेत 'प्रतिबिंब', 'छाया' या अर्थाने प्रतिमा हा शब्द वापरला जातो.

आदर्श मराठी शब्दकोशात प्रतिमेचा अर्थ - १) सादृश्य, साम्य २) धातू, पाषाण इत्यादीवर कोरलेली देवादिकांची मूर्ती ३) चित्र. असा दिला आहे.

डॉ. मा. गो. देशमुख यांनी प्रतिमेला Image हा शब्द वापरला व हे समीकरण बदलू नये असा आग्रह धरला.

श्री वा. गो. आपटे यांनी मराठी 'शब्द रत्नाकर' या कोशात प्रतिमा म्हणजे साम्य व्यक्त करणारी मूर्ती किंवा साधर्म्य व्यक्त करणारी वस्तू असा अर्थ दिला आहे.

वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोशात 'कल्पनेच्या पातळीवर इंद्रियगोचर होऊ शकणारा व जाणिवेने भारलेला कवितेचा प्राथमिक घटक म्हणजे प्रतिमा' अशी प्रतिमेची व्याख्या दिली आहे. अशा अनेकांनी व्याख्या केल्या असल्यातरी या सर्व व्याख्यांचा परामर्श घेऊन सुधीर रसाळ यांनी सर्व समावेशक अशी व्याख्या केली. ते लिहितात "प्रतिमा म्हणजे उच्चारांनी चिन्हांकित होणाऱ्या दोन किंवा अधिक मानसिक संदर्भांमध्ये म्हणजेच त्यातील संवेदनाकृती व तत्संलग्न भावनिक, वैचारिक घटक यामध्ये घडणाऱ्या साधर्म्य वैधर्म्याधिष्ठित आंतरक्रियेतून निर्माण होणारी मूर्त गतीशील, अनेकार्थी व सेंद्रिय संघटना"अशा अनेक व्याख्या झाल्या तरी पूर्णअंगानी व्यापक व्याख्या दिसून नाही म्हणून "बौध्दिक व भावनिक यांच्या संयोगातून क्षणार्धात अदृश्य कल्पनांचे आणि अनुभूतीचे मनूचक्षूसमोर इंद्रियगम्य असे मानसिक चित्र म्हणजे प्रतिमा "अशी स्थूल व्याख्या आपणास करता येईल. खरे तर प्रतिमेच्या व्याख्यांत गुंतण्यापेक्षा तिचे काव्यातील महत्व जाणणे गरजेचे आहे.

**कवितेत प्रतिमेचे अनन्य महत्व -**

कवितेची भाषा प्रतिमांनी बनलेली असते. स्वयंभूपणा, सेंद्रियत्व आणि मौलिकता प्रतिमेत असल्याने सौंदर्यनिर्मिती होते. कवीचा आत्मानुभव प्रतिमेत चित्रीत होत असल्याने कवीतेत कविच्या व्यक्तित्वाचे पैलू शोधता येतात. उत्कट भावनाविष्कार प्रतिमांच्या माध्यमातून कवी आपल्या कवितेत आणत असतो. कोणत्याही काव्यात प्रतिमेला अनन्यसाधारण महत्व असतेच किंबहुना प्रतिमेशिवाय काव्य म्हणजे जलाविना मासोळी.

प्रतिमेला इतके महत्व येण्याचे कारण म्हणजे तो काव्याचे व्यवच्छेदक लक्षण असते. प्रतिभाशक्तीने कवी कल्पनांच्या साहाय्याने अनेक नाविन्याने नटलेल्या प्रतिमा काव्यात योजतो व रसिक मनावर प्रतिमा चित्रून तिची भावचित्रे उमटतात. काहीवेळा रूपक, प्रतीक आणि प्रतिमा यांच्या सीमारेषा धुसर झाल्याने फरक कळत नाही. याचे उत्तम उदाहरण म्हणजे ज्ञानेश्वरी. 'जे न देखे रवी । ते देखे कवी' । हे कविच्या प्रतिमासृष्टीचेच द्योतक आहे. प्रतिमेमुळेच काव्यात नवचैतन्य येते व कविता आशयघन बनते. शब्दातही न पकडता येणाऱ्या अनेक तरल भावसंवेदना तो प्रतिमेच्या साहाय्याने आपल्या काव्यात अचूक पकडतो.

अशा या प्रतिमेचे अनेक प्रकार करता येतील. पण हे प्रकार भिन्न नसून यांच्या सीमारेषा एकमेकात गुंतलेल्या आहेत

१) दृश्यात्मक प्रतिमा २) श्रवणात्मक प्रतिमा / नाद प्रतिमा ३) स्पर्श प्रतिमा ४) गंध प्रतिमा ५) बौध्दिक प्रतिमा तसेच आदिप्रतिमा, स्वप्नप्रतिमा व सूत्रप्रतिमा असेही प्रकार संभवतात. असे प्रकार जरी असले तरी कवितेत प्रतिमेचे स्थान हे अनन्यसाधारण आहे. प्रतिमा काव्याचा प्राण असे म्हटले तरी अतिशयोक्ती होवू नये.

प्रतिमेची वैशिष्टये -

१) इंद्रिय अनुभवांच्या माध्यमातून तार्किक सत्यापर्यंत जाण्यासाठी कवितेमध्ये प्रतिमा कार्य करते म्हणून इंद्रिय संवेद्यता म्हणजे प्रतिमा. प्रतिमेतून [illegible] प्रत्यय देत असते.
२) प्रतिमा ही अर्थाची वलये निर्माण करीत असल्याने ती प्रसरणशील असते.
३) प्रतिमा अनुभवाधिष्ठित असते. तसेच तिला संघटन मूल्यही असते.
४) प्रतिमेतून अबोध अशा मनाची कल्पना देण्याचे सामर्थ्य असते.
५) [illegible] प्रतिमा असते.
६) प्रतिमेत भावना, कल्पना व संवेदना या तिन्हींचे [illegible] असते.
७) प्रतिमा म्हणजे अनुभूतीचे सार असते.
८) उत्कटता व तीव्रता हा प्रतिमेचा गुण आहे.
९) प्रतिमेत ताजेपणा, आवाहन, परखडपणा, नवनिर्मिती, साक्षात्कार, प्रचिती हे गुणधर्म असतात.

कवी आणि प्रतिमा -

कवी आणि प्रतिमा यांचा घनिष्ठ असा संबंध आहे. तो अभंग राहणार आहे. कवी हा आपल्याच विश्वात तल्लीन होत असतो. त्यातून त्याची अनुभूती घेण्याची ओढ जाणवते. या प्रचितीतूनच तो प्रतिमा साकारतो. कविच्या कल्पनेचे विश्व जेवढे मोठे तेवढेच कविचे व्यक्तिमत्व व्यापक ठरते. कल्प म्हणजे निर्माण करणे. म्हणून कल्पनाशक्ती म्हणजेच नवनिर्माणशक्ती होय. कल्पनेतूनच कवी निर्गुण गोष्टीलाही साकार सगुणत्व बहाल करतो ते केवळ प्रतिमेच्या बळावर. अनेकदा प्रतिमेचे स्थान कळत नाही. प्रतिमेचे मापन होत असताना कविच्या व्यक्तीमत्वाशी संबंध येतो. कारण प्रतिमा ही कविच्या कल्पनेतूनच साकारते. प्रतिमेमुळेच त्याचे साहित्य श्रेष्ठ ठरते. वास्तव जगातील अनुभव तो आपल्या प्रतिमेद्वारे वेचतो. भविष्याची मनोहारी स्वप्ने रंगवतो. हे कार्य कधी सहजूक तर कधी उत्कट भावनेतून होते. कविची प्रतिमासृष्टी म्हणजे अंतःरंगाचा आविष्कार. स्व चा अभिव्यक्ती. कविने ग्रहण केलेले दृश्य-अदृश्य रूपातील अनेक बहुसंख्य अनुभव प्रतिमेतूनच परावर्तीत होतात. हे अनुभव किंवा भावनाविश्व तो काव्यातून रसिकापुढे ठेवतो. स्वच्छंदपणे प्रतिकांचा वापर करून आपली कलाकृती श्रेष्ठ बनवितो. प्रतिमेतून सुसंगती, आशयपूर्णता आणि अर्थसखोलता काव्यास प्राप्त होते. अर्थात प्रतिमेमुळेच काव्य श्रेष्ठ ठरते असे नसून तो एक काव्याचा अविभाज्य घटक आहे. म्हणून प्रतिमेचे महत्व अनन्यसाधारण आहे.

थोडक्यात प्रतिमेच्या व्याख्या, प्रकार, प्रतिमेचे महत्व तसेच कवी आणि प्रतिमा, प्रतिमेची वैशिष्टये पाहिल्यानंतर आता 'नारायण सुमंत यांच्या 'नारायण पाराष्टी' या काव्यसंग्रहातील प्रतिमासृष्टी चा विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

ISSN : 2278-9308

नारायण सुमंत यांच्या नारायण पासष्टी कवितासंग्रहातील प्रतिमासृष्टी -

नारायण सुमंत यांचा 'नारायण पासष्टी' हा काव्यसंग्रह म २००६ साली सुविद्या प्रकाशनाने प्रकाशित केला आहे. प्रामुख्याने नारायण सुमंत हे कृषक कवी असल्याने त्यांची प्रतिमासृष्टी ही विलोभनीय, नैसर्गिक आणि वास्तव आहे. नेमका आशय देण्यासाठी त्यांची प्रतिमा असते. नेमक्या वर्मावर बोट ठेवून ते प्रतिमांच्या साहाय्याने मनातील भावना, कल्पना आणि वेदनांना कवितेत साकार करताना दिसतात. त्यांची कविताही सोज्वळ आणि गेयतेच्या अंगाने जाणारी, अभंगवृत्तात व लोकलयीचा बाज असणारी असून उचित प्रतिमांचा वापर केल्याने आशयगर्भ बनली आहे. त्यांच्या 'नारायण पासष्टी' या गेयकाव्यसंग्रहातून नाद, गंध, रूप, स्पर्श, निसर्ग आदि प्रतिमा आलेल्या आहेत.

नारायण सुमंत यांची निसर्ग प्रतिमासृष्टी ही रमणीय व भावपूर्ण आहे. 'दिस पावसाचं आलं ...'या कवितेत -

'आभाळाच्या भाळावर
साज कस्तुरीचं आलं
गंध मातीत माईना
फूल चाफयाचं लाजलं ...' (पृ. १२)

या चरणात 'आभाळाच्या भाळावर' ही प्रतिमा वापरून व्यापकता दाखवली आहे. या मातीत गंध मावत नाही, कस्तुरीची दरवळ पाहून 'फुल चाफयाच लाजलं' अशी प्रतिमा वापरून चाफयाच्या फुलाला सजिवता आणली आहे. 'मोहोरातलं झिंगण,' 'तिच्या उरात भरलं' या प्रतिमा वापरून चैतन्य आणि धुंदीचा कैफ वाढवला तसेच शृंगारही प्रगट केला आहे.

'दारी बांधते तोरण...' या कवितेत

'वसुंधरा ही आतुरली
आता संपू दे झुरणं
मेघा तुझ्या बासिंगासाठी
दारी बांधते तोरण...' (पृ ३८)

या चरणातून प्रेयसीची हूरहूर दिसतेच पण तो येण्यासाठी 'दारी बांधते तोरण ' ही प्रतिमा स्वागतासाठी मी सज्ज आहे हाच भावार्थ देते. प्रियकरासाठी 'मेघ' आणि प्रेयसीसाठी 'वसुंधरा' या प्रतिमातून त्यांचे जन्मोजन्मीचे नातेसंबंध अधिकच दृढ होतात.

'माहेर' या कवितेतही 'मातीचा हिरवा पदूर' आणि 'वाऱ्याचा झुला' या प्रतिमा वापरून माहेरची ओढ व्यक्त केली आहे.

'भेट अवकाळी' या कवितेत खूप दिवसानंतर होणारी अवकाळी भेट किती लाखमोलाची असते. यासाठी कविने

'अवकाळी आभाळाची भेट काळजात खोल
रोज भेटतो श्रावणी त्याला कवडीचा मोल '(पृ. ३)

अवकाळी भेटीचे 'काळजात खोल 'आणि रोजच्या भेटीसाठी 'कवडीचा मोल 'अशा प्रतिमेतून वर्णन केले आहे.

'रानामधल्या बोरीला' या कवितेत 'माथ्यावरच चांदण' 'तिच्या पानात सांडलं' हया प्रतिमा वापरून त्या चांदण्यात दंग झालेली बोर तिचा शृंगार दिसतो. तसेच

'फुलपाखरांचं थवं
तिला झोंबत राहयलं
फुलोऱ्यातल्या वाऱ्यान
गाणं गभीर गायलं' (पृ ३)

'छबीना' 'जत्रा' 'रात नभा हसली' या प्रतिमा वापरून [illegible] भावना आणि आशय उठावदार केला आहे.

शेतीसाठी पाणी महत्वाचे असते पण भारनियमामुळे शेतकरी त्रस्त आहे यासाठी 'भारनियमनाचा आवळला फास' या ओळीत 'फास' या प्रतिमेतून वेदनाच मांडली आहे. यासाठी शेतकऱ्यांनी बंड करण्यासाठी आता सज्ज व्हावे हा संदेश देण्यासाठी

'विसरा रे आता । पंढरीची वारी
दाभोळ रविवारी । प्रार्थनेला । (पृ. ६०)

अशा प्रतिमातून वास्तवतेचे जळजळीत अंजन कवी डोळयात घालताना दिसतात.

'आयात' या कवितेत कर्जाने कष्टी झालेला शेतकरी भाव आला म्हणून माल बाजारपेठेत नेतो पण तेथे घोर निराशा पदरी पडते. शेवटी 'विकोनिया आला । धोतरही' ही प्रतिमा वापरून कवी तो भणंग होत आहे याची जाणिव करून देतात.

'सबसिडी' कवितेत दुष्काळ निवारण्यासाठी सरकारने देऊ केलेल्या योजना कशा खोटारडया आहेत हे व्यक्त करताना नारायण सुमंत लिहितात

'भरल्या पूरात । फुटकीच होडी
सरकार धाडी । कुणब्याला '। (पृ. ५४)

या चरणात 'फुटकीच होडी' ही प्रतिमा खूप काही सांगून जाते.

'कृष्णमाया' या कवितेत भ्रष्टाचार आणि उच्चभ्रू लोकांमुळे शेतकरी भरडला जातो. दलालीमुळे भाव मिळत नाही. यासाठी 'घामाचे दामाने । गिर्‍हाईकेनासी शेती' या प्रतिमेतून कष्टाला योग्य मोबदला मिळत नाही हे वास्तवदर्शन घडते.

'हे हुंदके मातीतले' या कवीतेत मालाला बाजारभाव मिळत नाही म्हणून बंड करण्यासाठी शेतकरी जागा होण्यासाठी

'शेतीआधीच आता बाजार नांगरा रे
हे जळमटे दलाली लांणी गिळाया लागले' (पृ. ४४)

या ओळींतून 'बाजार नांगरा रे' आणि 'जळमटे दलाली' या प्रतिमा वापरून बंडाचा, संघर्षाचा अंगारच फुलवला आहे.

'भरवसा' कवितेतूनही विज्ञान युगात कशाचाच भरवसा राहिला नाही हे वेगवेगळया प्रतिमेतून दाखविले आहे. 'कुठल्याच मिठीचा आता भरवसा राहिला नाही' आणि 'उत्क्रांतीचा विषाणू मेंदूत वाढतो' अशा प्रतिमेतून अविश्वास आणि संपत चाललेली माणुसकी याची खंत दिसते.

'डिश ॲन्टेना' ही कविता तर संपूर्ण प्रतिमेतूनच उलगडते बदलत्या ग्रामजीवनाचा वेध. विज्ञान युगाचा प्रभाव, वाढलेला भ्रष्टाचार याच्यावर उपहासात्मक प्रहार जाणवतो. राजकारणाच्या वेडासाठी 'दिल्लीची चिंता सगळयांना कोण विचारी शेता' आणि 'माणूस उठला माणसातुनी भोंगवाद ये सारा' या प्रतिमा खूप अर्थ सांगून जातात.

'मिस इंडिया' या प्रतिमेतून भ्रष्टाचारामुळे देशच कसा नागवला जात आहे हे 'भारूड' या कवितेत सांगितले आहे. 'शेतकरी गीत' हे तर बंडांची निशाणीच आहे. 'पंचायती नांगरणे, सोसायटया कोळपणे, विश्रामगृहात पेरणी, विमानातून खुरपणी, लाल दिव्यातून राखणी' अशा प्रतिमा वापरून भ्रष्टाचाराविरोधी संघर्ष, बंड आणि राजकारणाचा धिक्कार करण्यासाठी कवी शेतकऱ्यांना आवाहन करतात.

शेतकरी भरडला जात आहे. नागवला जात आहे. याच्याच जीवावर दलाली जगते. कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यास उपाशीच राहावे लागते. यासाठी नारायण सुमंत अनेक प्रतिमा वापरून निषेध व्यक्त करताना दिसतात. तसेच शासन व्यवस्थेवरही टीका करताना दिसतात.



Scanned with OKEN Scanner